महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नियुक्त करावयाच्या गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक (State Quality Monitor) यांची कार्यप्रणाली निर्धारित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : मग्रारो-२०१२/प्र.क्र. ६०/रोहयो-१

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०६ सप्टेंबर, २०१३

वाचा : केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यान्वयीन मार्गदर्शक सूचना २०१३

प्रस्तावना :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना संपुर्ण राज्यात सन २००८ या वर्षापासून राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत मागील काही वर्षापासून राज्यात मोठया प्रमाणात कामे हाती घेण्यात आलेली आहेत. ग्रामीण भागात टिकाऊ स्वरुपाची मालमत्ता निर्माण करुन ग्रामीण भागातील उपजीविकेच्या संसाधनास मजबुती प्रदान करणे हा या योजनेचा महत्वाचा उद्देश आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत निर्माण होणा-या टिकाऊ स्वरुपाच्या मालमत्तांचा गुणात्मक दर्जा उंचावणे आवश्यक आहे. सबब, केंद्र शासनाने सन २०१३ च्या मागदर्शक सूचनांमध्ये या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामांची गुणवत्ता उंचाविण्यासाठी राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांच्या नियुक्त्या करण्याचे निदेश राज्यांना दिले आहेत. त्या अनुषंगाने राज्यात ३३ राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांची नियुक्ती करण्याची बाब व त्यांची कार्यप्रणाली निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकाची नियुक्ती करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांची नियुक्ती करण्याचा उद्देश खालीलप्रमाणे आहे.

- योजने अंतर्गत घेण्यात येणारी कामे ही योग्यरित्या सर्व्हेक्षण व अन्वेषण करुन व व्यवस्थित नियोजन करुन घेण्यात आलेली आहेत याची पाहणी करणे.
- कामाची गुणवत्ता अंदाजपत्रकाप्रमाणे योग्य राखण्यात आल्याची खात्री करणे.
- योजनेच्या कार्यान्वयनातील त्रृटी शोधुन त्या दूर करण्यासाठी शिफारशी करणे.

कालावधी व प्रशिक्षण :

राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांचा सेवाकालावधी सर्वसाधारणपणे ३ वर्षांसाठी राहील. तथापि, त्यांच्या कार्याचे मुल्यमापन प्रत्येक वर्षाला करण्यात येईल व प्रत्येक वर्षामध्ये त्यांचे कार्य समाधानकारक असल्यास पुढील वर्षाकरीता त्यांना मुदतवाढ देण्यात येईल.

राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांची निवड झाल्यानंतर त्यांना १ दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येईल व त्यांनी करावयाच्या कामांबद्दल परिपूर्ण माहिती देण्यात येईल. कुठल्याही स्थितीत राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांना त्यांचे स्वग्राम जिल्हयात नियुक्ती देऊ नये.

२. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकाची कर्तव्य व जबाबदा-या.

१) एका जिल्हयात निर्देशित केलेल्या दिवशी कमीतकमी २ कामांची पाहणी करणे. अशा पध्दतीने एका महिन्यातून कमीतकमी १० कामांची पाहणी करणे.

२) सोपविलेले निरिक्षणाचे काम पुर्ण करणे व त्याबाबतचा निरिक्षण अहवाल विहित नमुन्यात तयार करणे.

३) शासनास वस्तुनिष्ठ, परिपुर्ण व अचूक माहिती सादर करणे.

४) गुणवत्ता दर्जा सुधारण्यासाठी व योजनेच्या कार्यान्वयनातील त्रृटी दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकाची कामे.

१) आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर या कार्यालयाने सूचविल्याप्रमाणे जिल्हयात पाहणी करावयाच्या कामांचा पाहणी आराखडा (Visit Plan) तयार करावा. सदर पाहणी आराखडा कमीतकमी ७ दिवस अगोदर उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांना कळवावा.

२) नेमून दिलेल्या दिवशी कामाचे निरिक्षण करावे.

३) प्रत्येक कामाचा निरिक्षण अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र – अ व ब मध्ये २ प्रतीत तयार करावा. त्यापैकी एक प्रत जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी/सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना समक्ष भेटून सादर करावी. सदर अधिकारी उपलब्ध नसल्यास उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा उपजिल्हाकारी (रोहयो) यांच्याकडे निरिक्षण अहवालाची प्रत द्यावी. दुसरी प्रत प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला नोडल आधिकारी, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना सादर करावी.

४) प्रत्येक ३ महिन्यानंतर जिल्हयांचा सर्वंकष निरिक्षण अहवाल तयार करावा व सदर अहवाल आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना सादर करावा. नियोजन, संकल्पन, जागेची निवड, कामाचे कार्यान्वयन व निरिक्षण यामध्ये वारंवार आढळणा-या चुका/उणिवा दुर करण्यासाठी सुचविण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा समावेश सदर अहवालामध्ये असावा. सदर उपाययोजनामध्ये दिर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असावा व प्रशिक्षणासाठी आवश्यक क्षेत्र सूचविण्यात आलेली असावीत.

४. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांना अनुज्ञेय मानधन व भत्ते.

अ) मानधन : रुपये १५००/- प्रतिदिन प्रति राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक (सोपविलेल्या कामाचे दिवशी)

ब) दैनिक भत्ता : शासनाच्या वर्ग -१ च्या अधिका-यांना अनुज्ञेय (ग्रेड वेतन-रू. ५४००/-) असलेला दैनिक भत्ता.

क) प्रवास भत्ता : राहण्याच्या ठिकाणापासून तपासणीच्या जिल्हा मुख्यालयापर्यन्त रेल्वे अथवा अन्य वाहनाने प्रवास अनुज्ञेय असेल. प्रवासासाठी जवळच्या मार्गाने द्वितीय वातानुकूलित श्रेणी अथवा अन्य वाहनाने किंवा अंशत: रेल्वे व अंशत: वाहनाने प्रवास करणे अनुज्ञेय राहिल. यासाठी त्यांना प्रति कि.मी. रुपये ८ या दराने खर्चाचा परतावा अनुज्ञेय राहिल.

ड) वास्तव्य खर्च : राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्या राहण्याची सोय प्राधान्याने शासकिय विश्रामगृहात करण्यात यावी. तथापि, विश्रामगृह उपलब्ध नसल्यास खाजगी लॉजमध्ये व्यवस्था करावी. यासाठी शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दिनांक ३ मार्च, २०१० नुसार परतावा अनुज्ञेय असेल.

५. आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांची भूमिका :

राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर या कार्यालयातील एका अधिका-याची नियुक्ती नोडल अधिकारी म्हणून करण्यात येईल. सदर नोडल अधिकारी तपासणी करावयाच्या कामाची यादी तयार करतील. सदर यादी तयार करतांना विविध प्रकारची कामे विशेषत : मोठया प्रमाणात खर्च करण्यात आलेली कामे (high expenditure works, variety of works) व प्राप्त झालेल्या कामांच्या तक्रारी यांचा विचार करण्यात यावा. निवड केलेल्या कामांची यादी ई-मेलद्वारे राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांचे मानधन व दैनिक भत्ता आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांचे कार्यालयाकडून अदा करण्यात येईल यासाठी संबंधित राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांने त्याच्या स्वत:च्या बँक खात्याची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालयाने राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकामार्फत प्रत्येक महिन्यात झालेल्या दौ-याचा सविस्तर तपशिल आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर या कार्यालयास उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहिल.

६. उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालयाची भुमिका :

उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी प्राप्त झालेल्या कामाच्या यादीनुसार संबंधित अधिका-यांना सर्व संबंधित अभिलेखे (कामाचे अंदाजपत्रक, नकाशा, हजेरी पत्रक, मोजणी नोंदवहया इत्यादी) उपलब्ध करुन देण्याच्या व निरिक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. उप अभियंता (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय, हे त्यांच्या जिल्हयातील राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांचे दौ-याचे बाबतीत नोडल अधिकारी म्हणून काम करतील. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांचा प्रवास खर्च व वास्तव्याचा खर्च उपरोक्तप्रमाणे उपजिल्हाधिकारी (रोहयो शाखा) कार्यालयाकडून अदा करण्यात येईल. या करीता राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांनी दौ-याच्या शेवटच्या दिवशी प्रवास व वास्तव्य खर्चाबाबतची देयके विहित नमून्यात उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविणे अनिवार्य आहे. तसेच संबंधित राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांने त्याच्या स्वत:च्या बँक खात्याची सविस्तर माहिती उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

७. निरिक्षण अहवालावरील पुर्तता कार्यवाही :

जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाचे विश्लेषण करावे व कामाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार पुढील योग्य कार्यवाही करावी. तसेच तपासणीमध्ये काही गंभीर त्रृटी वा अपहार निदर्शनास आल्यास प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी. याबाबतचा कार्यपुर्तता अहवाल नोडल अधिकारी, आयुक्त कार्यालय, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर कार्यालय, नागपूर यांच्याकडे पाठवावा.

आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर कार्यालय, नागपूर यांनी राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षकांकडून प्राप्त झालेले निरिक्षण अहवाल व जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या निरिक्षण अवहालावंरील पूर्तता कार्यवाही यांचे संकलन व विश्लेषण करून संपूर्ण राज्याचा सर्वंकष एकत्रित अहवाल सहा महिन्यातून एकदा शासनास सादर करावा.

८. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांचे मानधन व भत्ते १५ दिवसापेक्षा जास्त कालावधीकरीता प्रलंबित ठेवू नये. यासंदर्भातील सर्व जबाबदारी संबंधित नोडल अधिकारी यांची राहिल.

९. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरीक्षक यांच्या कार्यप्रणालीबद्दल गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा अफरातफर/ अनियमतता यामध्ये सकृतदर्शनी दोषी आढळल्यास किंवा शासनाची दिशाभूल केल्यास त्यांना कोणतेही कारण न देता काढून टाकण्याचे अधिकार आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना राहतील.

१०. राज्य गुणवत्ता व्यवस्थापन निरिक्षक यांच्याशी निगडित बाबींवर होणारा खर्च हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अनुज्ञेय प्रशासकीय खर्चामधून करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक 201309190904020E09E असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

6/9/2013

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो)महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४००३२
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
(महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारीण् नियोजन विभाग (रोहयो)
सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो-१)

प्रपत्र अ

FORMAT FOR QUALITY MONITORING OF MAHATMA GANDHI NREGA WORKS

(For State Quality Monitors)

(1)Quality monitoring carried out by..... Date of Quality monitoring.....
(2) Location of Work & Khasra No..... Village..... Block..... District-----
---

(3) Name of beneficiary----------
(4) Implementing Agency----------

s. No. (1)	CATEGORY OF WORK/NAME OF WORK/STARTED ON/COMPLETED ON/IN PROGRESS (2)	PHYSICAL DETAIL OF WORK IN MKS (3)	QUALITY ASPECT OF WORK TO BE EXAMINED (4)	YES/NO & IS OK/NOT OK (5)	SUGGESTIONS FOR IMPROVEMENT (6)
	TO BE FILLED AS PER ANNEXURE-35	TO BE FILLED AS PER ANNEXURE-35	TO BE FILLED AS PER ANNEXURE-35		

(5) AS & FS No./ Dated/ Amount (Rs. in lakh)----------
(6) TS No./ Dated/ Amount (Rs. in lakh)----------
(7) Expenditure made so far (Rs in lakh) ----------
(8) Labour Material ratio ----------
(9) Work as per action/ work plan approved by Z.P. Yes/No
(10) Work executed with- Manual labour / Machine
(11) Percentage of completed work on the date of monitoring --- %
(12) Information Display Board with details at work site-- Yes/No
(13 Overall Quality of work S/U/RI
(14) Present condition of work S/U/RI
(15) Any complaint/irregularity in respect of wage payment Yes/No
If yes, details----------
(16) Any other important information----------
(17) Views of Beneficiary /Community on utility of Asset ------
(18) Overall comment of the quality monitor.....

(SIGNATURE OF QUALITY MONITOR)

प्रपत्र ब

s. No. (1)	CATEGORY OF WORK/NAME OF WORK/STARTED ON/COMPLETED ON/IN PROGRESS (2)	PHYSICAL DETAIL OF WORK IN MKS (3)	QUALITY ASPECT OF WORK TO BE EXAMINED (4)
(I)	(i) Water conservation & water harvesting; -contour trenches -contour bunds - boulder checks -gabion structure -underground dykes -earthen dam -stop dam -spring shed development	L —, B— height/ depth---- (in meter) Storage capacity----- (in cu. meter)	1. Required survey made
			2. Hydrological and Hydraulic design w.r.t. Catchment made- 2.1 If yes is it OK
			3. Structural Design made- 3.1 If yes is it OK
			4. Construction of bund with leaving berm, clod breaking and designed side slope made-
			5. Inlet and outlet constructed 5.1 If yes is it OK
(ii)	Drought proofing (including afforestation and tree plantation);	Area in ha.....	1. Selection of species, as per demand of beneficiary/ agroclimatical Zone-
			2. Survivality --------
			3. Growth of plants is satisfactory
			4. Arrangement for maintenance- 4.1 If yes, how
(iii)	Irrigation canals including micro and minor irrigation works;	1. Length in K.M.-- 2. Command declared in -----ha. 3. Actual area irrigated in -------ha	1. Required survey made / L-Section prepared- 1.1 If yes is it OK
			2. Hydraulic and structural design made- 2.1 If yes is it OK
(iv)	Irrigation facility, - dug out farm pond - horticulture, - plantation, - farm bunding, -land Development (On the land of Individual)	Beneficiary— 1. SC/ST/BPL/IAY/L and reform/ 2. Name of beneficiary-------	**Irrigation facility:** 1. Required survey made / L-Section prepared- 2. Type of irrigation facility
			3. Hydraulic and structural design made- 3.1 If yes is it OK

			Horticulture & Plantation: 1. Selection of species, as per demand of beneficiary/ agroclimatical Zone
			2. Survivality --------
			3. Arrangement for maintenance- 3.1 If yes how ----------
			Land development: 1. Required topographical survey made- 2. Design before execution made- 2.1 If yes is it OK-
(v)	Renovation of traditional water bodies including de silting of tanks;	L —, B— height/ depth---- (in meter)	1. Hydrological and Hydraulic design w.r.t. Catchment made- 1.1 If yes is it OK
			2. Structural Design made 2.1 If yes is it OK
			3. Construction of bund with leaving berm, clod breaking and designed side slope made.
			4. Increase in Storage capacity
(vi)	Land Development	; Area in ha developed.....	1. Required topographical survey made-
			2. Design before execution made- 2.1 If yes is it OK
(vii)	Flood control and protection works including drainage in water logged areas; deepening and repairing of flood channels, chaur renovation, construction of storm water drains for coastal protection	Area in ha benefited..... & -------cum. earth work	1. Hydrological and Hydraulic design w.r.t. Catchment made- 1.1 If yes is it OK
			2. Structural Design made- 2.1 If yes is it OK
			3. Construction of bund with leaving berm, clod breaking and designed side slope made-
(vii)	Rural connectivity to provide all -weather access;	L —, B— height/ Average Depth-------(in meter)	1. Layout with boundary pillar given

(SIGNATURE OF QUALITY MONITOR)